# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 28/09/2017 रोजी (का.प.क्र.09) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक 28 सप्टेंबर 2017 रोजी (का.प.क्र .09) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 03-10 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला श्री.रविंद्र निकम, उपआयुक्त (प्रशासन) नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
11. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
12. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्रीमती किर्ती शिंदे : मा.आमदार श्री.अतुलजी सावे यांची विधानसभा विशेष हक्क समितीचे अध्यक्ष म्हणुन निवड झाली, त्याबध्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे : अनुमोदन आहे.

मा.सभापती : अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येतो.आजच्या सभेला जे जे अधिकारी विना परवानगी अनुपस्थित आहे त्यांचेवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : भुमिगत गटार योजनेवर 6-7 बैठकीत चर्चा केली. ती योजना फेल झाली पीएमसी व एजन्सीला प्रशासनाने पाठीशी घातले. सभागृहात चर्चा झाली त्यानुसार टेक्नीकल व फायनाशीयल ऑडीट करण्याचे आदेशीत केले होते अहवाल प्राप्त झाला जे प्रश्न केले तेच त्या अहवालात आले त्या अहवालाची प्रत काल प्रत मिळाली त्यावर अभ्यास झाला नाही त्यात प्रशासनातील अधिकारी दोषी असल्याचे आढळून आले आहे. 4 एम बी चे फायन्सशीयल ऑडीट केले आणखी 10 बाकी आहे. 2016 च्या पुढील ही ऑडीट करण्याचे व त्या विभागासाठी कर्मचारी कमी असेल तेही देण्याचे आदेशीत करावे व यावर चर्चा करणेसाठी विशेष सभा घ्यावी. त्यावेळी आयुक्तांनी उपस्थित असावे असे आदेशीत करावे.

श्रीमती किर्ती शिंदे : यावर स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत अनेकदा चर्चा केली दिशाभूल करणारी उत्तरे दिली गेली मुळात डीपीआरच चुकीचा केलेला होता मनमानी पध्दतीने कामे झाली त्याबाबत उत्तर देणेसाठी प्रशासनाने वेळ मागितला आहे यावर चर्चा करणेसाठी विशेष सभा घ्यावी त्यात आयुक्तांनी उपस्थित असावे जे त्या योजनेच्या कामामध्ये दोषी असेल कार्यवाही करावी योजनेचे काम चालू केले अनेक ठिकाणी खोदकाम केले मलबा तेथेच पडून आहे वेळीच कार्यवाही होत नाही.

श्रीमती मनीषा मुंढे : माझे वार्डात गटार योजनेतून काम होत नाही नाल्यातून पाणी वाहते लोकांच्या घरात घाण पाणी जाते सहा दिवसा आड पिण्याचे पाणी येते ते ही घाण असते अनेक नाल्यातून

आजही पाणी वाहते अधिकारी एजन्सीला पाठीशी घालत आहे.अडीच वर्षापासून आम्ही बोलतो कार्यवाही होत नाही.

मा.सभापती : स.सदस्यांची सुचना लक्षात घेऊन तेथे पाहणी करावी योग्य पध्दतीने काम तात्काळ करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : व्हीजीट केली परंतु तेथे काम केले नाही 2-3 गल्ल्यात त्यांचे वार्डात नळाला घाण पाणी येते भविष्यात तशी परीस्थिती होऊ नये श्री.चहल हे काम करीत नसेल तर योग्य नाही त्यांचेवर कार्यवाही करावी.दोन दिवसात तेथील काम व्हावे.

श्रीमती किर्ती शिंदे : भुमिगत गटार योजने राबवित असलेली पीएमसी व त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : भुमिगत गटार योजनेच्या संदर्भात आलेल्या अहवालवर 4 तारखेला बैठक आयोजित केली जाईल त्या बैठकीला आयुक्तांनी ही उपस्थित असावे. उर्वरीत 10 एमबीचे ही ऑडीट करावे मुख्य लेखा परीक्षक यांना आवश्यक ते कर्मचारी उपलब्ध करून दयावे.भुमिगत गटार योजनेचे काम पाहणारे श्री.अफसर सिध्दीकी यांनी ऑडीटसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे मुख्य लेखा परीक्षक यांना दयावीत.

श्रीमती मनीषा मुंढे : माझे वार्डात तुळजाभवानी मंदीराजवळ हायमास्ट लाईट बंद आहे काम केले जात नाही. अधिकारी फोन घेत नाही. ठेकेदारास पाठीशी घालू नये.

उपअभियंता-विदयुत : थ्रीसेट लाईट त्यातील एक लाईट बंद आहे तेथे मंडप होता काम करता आले नाही उदया सकाळ पर्यत काम करावे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी तात्काळ तेथील लाईटचे काम करावे.

श्री.सिताराम सुरे : गणपती उत्सव व नवरात्र महोत्सव काळात वार्डात 50 टक्के लाईट बंद होते 15-20 लाईट लावले गेले लाईट लावणार नसेल तर एजन्सीला बील देऊ नये लाईट लावल्यानंतर लगेच बंद पडतात संबधीत लाईटचे काम घेणारे श्री रईस गुत्तेदार काम करीत नाही त्यांना ब्लॅकलिस्ट करावे.

मा.सभापती : आठ दिवसाच्या आत लाईटचे काम करावे शहर अभियंता यांनी दखल घ्यावी वेळेत लाईटची कामे केली असती तर महापालिकेच्या बिलात बचत झाली असती 120 कोटीची निविदा केली ते काम न करता दुसरे कामासाठी पुन्हा संचिका सादर होतात मेन्टन्स किती, त्यातून खर्च होतो तो खर्च वाचला असता.

श्री.रेणुकादास वैद्य : एलईडी लाईटचे टेंडर झाले वर्क ऑर्डर झाली काम सुरू नाही यावर चर्चा झाली होती पुढे काही कार्यवाही नाही. हे काम झाले असते तर मनपाचे देयकामध्ये 25-50 टक्के बिल कमी आले असते.120 कोटीचे लाईटचे टेंडर काढले असतांना दुसरे 5-10 लक्षचे काम करणेसाठी संचिका मुमेंन्ट मध्ये आहे.त्या का करण्यात आल्या. हे काम होत नसल्याने मेन्टन्संवर करोडो रूपये खर्च होत आहे.ते वाचले असते. ज्या संचिका तयार होत आहे त्या थांबविणार की नाही.

कार्य.अभियंता-विदयुत : 120 कोटीचे टेंडर काढले त्या बाबतीत एस्क्रो अकाऊंट ओपन करायचे आहे त्यामध्ये तीन महिण्याचे पैसे भरणा करायचे आहे त्यानंतर काम सुरू होईल मधल्या काळात ज्या संचिका करण्यात आल्या त्या थांबविणेसाठी मा.आयुक्ताकडे संचिका पाठविली आहे.त्यास मंजुरी मिळाली तर लाईटवर एलईडी शिवाय खर्च होणार नाही. जेथे लाईटची व्यवस्थाच नाही तेथे काम करावे लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या इतर सर्वच भागात लाईट लावायचे असेल तर एलईडीचा ठेका रद्य करावा इतर एजन्सीकडून लाईटचे काम करावे.सभापती यांनी पाहणी करावी जेथे गरजेचे आहे तेथे लाईटची कामे करावे.

मा.सभापती : लाईट लावण्या बाबत तातडीने कार्यवाही करावी. तीन तारखेला बैठक घेऊ त्यात माहिती घेतली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य : एस्क्रो अकाऊंट उघडण्यास दीड वर्षाचा कालावधी का लागला.

| | |
|---|---|
| मुख्य लेखाधिकारी | : एस्क्रो अकाऊट उघडणेसाठी कार्य.अभियंता यांचेकडून जून पासून 2-3 पत्र आलेले होते त्यावर ती संचिका कोणती आहे पाठपुरावा केला अटी व शर्ती काय आहे तपासल्या. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : मा.आयुक्तांशी या संदर्भात बैठक घेऊन योग्य ती कार्यवाही करावी एलईडीच्या माध्यमातून कामे झाल्यास मनपाचा देखभाल दुरूस्तीचा होणारा खर्च ,जे बील भरतो त्यात होणारी बचत होईल. एलईडीचे काम सुरू होत नाही त्यामूळे पुर्वी रेटलिस्ट, ए-1 पध्दतीने कामे चालू होती त्या पध्दतीने आता कामे होत आहे.ते थांबविले पाहिजे. |
| मा.सभापती | : तीन तारखेला बैठक आयोजित केली जाईल त्यात माहिती घेऊ. |
| श्री.सिताराम सुरे | : एलईडीचे फक्त लाईट रिप्लेस करणार आहे जेथे पोल नाही तेथे लाईट कोण लावणार आहे. |
| कार्य.अभियंता-विदयुत | : जेथे लाईनची व्यवस्थाच नाही तेथे व्यवस्था केली जाईल.एलईडी मध्ये फक्त रिप्लेसमेंन्ट करायचे आहे. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : बनेवाडी येथील शाळेचे भाडे देणे विषयी बोललो होतो कार्यवाही केली नाही.पहिल्या मजल्यावर शाळा आहे ती तळ मजल्यावर असावी मा.आयुक्तांनी आदेशीत केले होते संचिका तयार केली थांबविण्यात आली. |
| उपआयुक्त-प्रशासन | : तळमजल्यावर शाळा पाहिजे योग्य आहे हातोहात संचिका आली व दुसरीकडे जागा नाही व भाडे करार करणे बाबत नमूद केलेले होते या संचिका बाबत 15-20 दिवसात कार्यवाही होईल. |
| मा.सभापती | : दहा तारखेच्या आत पेमेंन्ट करावे. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : बडीगिरणी शाळेला मुख्याध्यापक नाही. |
| शिक्षणाधिकारी | : एकाची बदली करण्यासाठी इतर 5-6 लोकांच्या बदल्या कराव्या लागतात योग्ये तो निर्णय घेतला जाईल. |
| श्री.सिताराम सुरे | : माझे वार्डात ठेकेदार सिध्दीकी यांना काम दिले ते वेळेत काम केले नाही. कामाची मुदत संपली कार्यवाही का होत नाही. |
| मा.सभापती | : शहर अभियंता यांनी तपासणी करावी कार्यवाही करावी. |
| श्री.सिध्दात शिरसाट | : 100 कोटी देऊन ही रस्त्याची कामे का होत नाही. |
| शहर अभियंता | : शंभर कोटी अदयाप मिळालेले नाही शासनाचे निर्देश मिळाले की निविदा वगैरे करून कार्यवाही करू शकतो. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : अधिकारी यांचेवर कार्यवाही होत नाही सभागृहाचे आदेशाचे अधिकारी पालन करीत नाही सभापतीचे अधिकार काय,कार्यवाही होणार की नाही.जे अधिकारी मा.सभापती यांचे आदेशाचे पालन करीत नसेल तर काय कार्यवाही करणार आहे. |
| मा.सभापती | : ज्या सुचना दिल्या त्या नुसार कार्यवाही प्रशासनाला करावी लागणार आहे. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : मागिल बैठकील माझे वार्डातील डी पी रस्ता मोकळा करण्याचे सांगितले होते रेल्वेस्टेशन रस्त्यार 40 मटन शॉप आहे ते हटविले नाही बनेवाडी रस्त्यावर घर बांधले मुद्दे मांडले कार्यवाही होत नाही भाजी मंडई बाबत कार्यवाही नाही 9 मी. कॉक्रीट रस्ता केला त्यात पोलीस स्टेशनची इमारत येते ती का काढली जात नाही.धुत बंगला ते विशाल मेघा मार्ट पर्यत रस्ता मंजूर आहे सध्या तो रस्ता रस्ता सिंगल आहे तो डीपी प्लॅन नुसार 12 मीटर आहे त्याप्रमाणे रूंद का होत नाही.रस्त्याचे अंदाजपत्रक करतांना साईड ड्रेनच्या खर्चाचा समावेश का होत नाही.साईड ड्रेन नसेल तर रस्त्यावर पाणी तुंबते नागरीकांना त्रास होतो. |
| मा.सभापती | : सदस्यांनी केलेल्या सुचनाची दखल घेऊन कार्यवाही करावी. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : 100 कोटीतून रस्त्याची कामे करतांना साइ्ड ड्रेन मधुन पाणी वाहून जाईल अशी व्यवस्था करावी लोकांच्या घरात पाणी जाऊ नये. याची दखल घ्यावी. |
| मा.सभापती | : सदस्यांनी केलेल्या सुचनाची कार्यवाही करावी. |

श्रीमती किर्ती शिंदे : पर्यटन कक्ष सुरू केले त्या विदयार्थ्याचे मानधन दिले जात नाही.

उपआयुक्त-महसूल : पत्र तयार करून मा.आयुक्ताची मंजूरी घेतली आहे की विदयापीठ विभागाने पत्र देऊन मागणी करावी की मनपा सोबत करार करतो त्यांचे पेमेंन्ट करतो त्यानुसार त्यांना धनादेश दिला जाईल.

मा.सभापती : तातडीने कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : माझे वार्डात 7-8 वार्डाचा जमा झालेला कचरा आणून टाकला जातो

कक्ष प्रमुख-घनकचरा : माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी कचरा त्वरीत उचलावा.

श्रीमती स्वाती नागरे : 5-6 नवीन जेटींग मशीन येणार होते

उपअभियंता-यांत्रिकी : चेसींस पुरवठा करण्याचे आदेशीत केले आहे पेमेन्ट देणे बाबत पत्र दिले आहे.

मा.सभापती : लेखा विभागाचे तातडीने कार्यवाही करावी.

**विषय क्र. 108 : (कार्य.अभि. पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.92, विश्रांतीनगर या वसाहती अंतर्गत जयभवानीनगर भागामध्ये 100 मीमी व 150 मीमी व्यासाच्या डी.आय.के.-7 वितरण जलवाहीन्या टाकणे करीता रूपये 39,84,602/- किमंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून महानगरपालिका निधीतून सदरील काम करण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त असून प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 108,109 व110 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.92, विश्रांतीनगर या वसाहती अंतर्गत जयभवानीनगर भागामध्ये 100 मीमी व 150 मीमी व्यासाच्या डी.आय.के.-7 वितरण जलवाहीन्या टाकणे करीता तयार करण्यांत आलेल्या र.रू.39,84,602/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 109 : (कार्य.अभि. पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.92, विश्रांतीनगर या वसाहती अंतर्गत जलवाहीनी जोडण्याकरीता पुंडलिकनगर जलकुंभा पासून ते होळकर चौकापर्यंत 300 mm, 200 mm व्यासाच्या डी.आय. मुख्य जलवाहीनी टाकणे करीता रूपये 28,53,846/- किमंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून महानगरपालिका निधीतून सदरील काम करण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त असून प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.92, विश्रांतीनगर या वसाहती अंतर्गत जलवाहीनी जोडण्याकरीता पुंडलिकनगर जलकुंभापासून ते होळकर चौकापर्यंत 300 mm, 200 mm व्यासाच्या डी.आय. मुख्य जलवाहीनी टाकणे करीता तयार करण्यांत आलेल्या रूपये 28,53,846/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 110 : (कार्य.अभि. पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.112, शिवाजीनगर वार्डातील साईनगर, भारतनगर या परिसरात 100, 150 व 200 मीमी व्यासाच्या डि आय के-7 जलवाहिन्या टाकणे करीता रूपये 49,11,518/- चे अंदाजपत्रकास मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक 30/03/2017 नुसार प्रशासकीय व आर्थिक रूपये 25,00,000/- मान्यता दिली आहे. मा.स्थायी समिती सभा दि.29/07/2017 विषय क्र.44 नुसार एच.डी.पी.ई. पाईप टाकण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रूपये 45,67,514/- ठराव मंजुर करण्यात आलेला आहे. रूपये 25 लक्ष दलित वस्ती सुधार योजनेतून व उर्वरीत 20 लक्ष महानगरपालिका निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. स.नगरसेवक यांनी पुनश्च पत्र देवून

वाहतुकीची वर्दळ व डी.आय. पाईपचे आयुष्य पाहता डी.आय. पाईप टाकण्याची विनंती केली आहे. त्याप्रमाणे रूपये 45 लक्ष किमंतीचे सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.112, शिवाजीनगर वार्डातील साईनगर, भारतनगर या परिसरात 100, 150 व 200 मीमी व्यासाच्या डि आय के-7 जलवाहिन्या टाकणे करीता तयार करण्यांत आलेल्या सुधारीत र.रू. 45 लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 111 : (कार्य.अभि. पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर समांतर जलवाहिनी प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत होता. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. (कन्सेशनर) यांनी प्रकल्पामध्ये अनेक अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेने दिनांक 01.10.2016 रोजी संबंधीतांना Terminate केले आहे. तेंव्हा पासुन पाणी पुरवठा विषयक सर्व कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

- शहरातील विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी 5000 लि. क्षमतेचे 65 व 10,000 लि. क्षमतेचे दोन टँकर भाडेतत्वावर लावण्यासाठी सातारा-देवळाई भागात पाणी पुरवठा करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार रक्कम रुपये 5,03,28,025/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.
- कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/उअ (जायां)/211 दिनांक 07.10.2016 नुसार सातारा-देवळाई परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेल्या भाडेतत्वावरील वॉटर टँकरचे दर खालील प्रमाणे आहे.

| 1 मे.टन | |
|---|---|
| प्रति दिन भाडे | प्रति किमी भाडे |
| रु. 175/- (रुपये एकशे पंच्याहत्तर) | रु. 2.30 (दोन रुपये तीस पैसे) |

- सदरील अं.प.रक्कम रु 5,03,28,025/- च्या खर्चास दिं.13.10.2016 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केली.
- मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.693 दिं 13.10.2016 प्रमाणे वॉटर टँकर भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता घेण्यात आली सदरील ठरावाची प्रत दिनांक 01.11.2016 रोजी प्राप्त झाली.
- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर निविदा प्रारुप तयार करुन दिनांक 07.11.2016 रोजी निविदा प्रसिध्दीस ई-टेन्डर विभागास देण्यात आली.
- सदरील निविदा ई-टेन्डर विभागाने दिनांक 17.11.2016 रोजी प्रसिध्द केली.
- निविदा प्रसिध्द केल्यानंतर या कामासाठी चांगल्या एजन्सी मिळण्याच्या दृष्टिने दिनांक 13.12.2016 रोजी "ज्या निविदाधारकांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे/असून आणि ज्यांना अठ्ठेचाळीस (48) तास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची पोलीस कोठडी झालेली आहे, असे कंत्राटदार निविदा भरण्यास पात्र होणार नाही." असे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.
- दिनांक 16.01.2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे श्री.संजय पवार तत्कालीन मुख्य लेखाधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेप्रमाणे वरील अट रद्द करण्यासाठी आदेशीत केले.त्याप्रमाणे सदरील अट दि.17.01.2017 रोजी रद्द करुन शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.
- प्रथम वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे जास्तीच्या निविदा प्राप्त होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली.
- दुसऱ्या वेळेस मुदतवाढ देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा दाखल करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत (दिं.19.01.2017) एकुण चार निविदा प्राप्त झाल्या.

- प्राप्त चार निविदांची तांत्रिक बिड उघडण्यात आली.
- प्राप्त चारही निविदा तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्यामुळे फेरनिविदा मागविण्याच्या मान्यतेसाठी संचिका दिनांक 01.02.2017 रोजी सादर करण्यात आली.
- मा.आयुक्त महोदय यांची फेरनिविदा मागविणेसाठी दिनांक 18.02.2017 रोजी मान्यता मिळाली.
- दिनांक 21.02.2017 रोजी विभागास संचिका प्राप्त झाल्यानंतर दिनांक 22.02.2017 रोजी तिसरी वेळेस फेरनिविदा मागविण्यात आल्या.
- तिसरी वेळेस निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख दिनांक 15.03.2017 होती.
- तिसऱ्या वेळेस सुध्दा एकही निविदा प्राप्त झाली नाही.
- चौथ्या वेळेस निविदा प्रसिध्द करण्यात आली असता दिनांक 26.04.2017 रोजी एकही निविदा प्राप्त झाली नाही.
- अटी व शर्तीमध्ये शिथीलता करुन पुन्हा निविदा काढण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 16.06.2017 रोजी मिळाल्यानुसार दिनांक 17.06.2017 रोजी फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. एकच निविदा प्राप्त झाल्याने निविदेस मुदतवाढ देण्यात आली. मुदतवाढ देऊनही दिनांक 30.06.2017 पर्यंत एकच निविदा प्राप्त झाल्याने दिनांक 01.07.2017 रोजी फेर निविदा मागविण्यात आली आहे.
- निविदा दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण 4 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदांची तांत्रिक बीड उघडण्यात आली असून निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी व पडताळणी चालू असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे दर**

| **अ.क्र** | **क्षमता** | **प्रतिदिन भाडे** | **प्रति किलो मीटर भाडे दर रुपये- पैसे** |
|---|---|---|---|
| | प्रति 1 मॅट्रीक टन | रु. 148/- | रु. 1.80 |
| 1 | 5000 लि. (5 मे. टन) | रु. 740/- | रु. 9.00 |
| 2 | 10000 लि. (10 मे. टन) | रु. 1480/- | रु. 18.00 |
| **सातारा-देवळाई पाणी पुरवठा मंजुर दर** | | | |
| 1 | 5000 लि./ 10000 लि. (5/10 मे. टन) | रु. 175/- | रु. 2.30 |

**औरंगाबाद वॉटर युटिलिटीचे मंजुर दर, मे.गोल्ड कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद**

| **अ.क्र** | **क्षमता** | **प्रति ट्रीप** |
|---|---|---|
| 1 | 5000 लि. | रु. 350/- |
| 2 | 10000 लि. | रु. 720/- |

**दररोज साधारणपणे टँकरसाठी येणारा खर्च (तक्ता-अ)**

| **अ.क्र** | **क्षमता** | **सरासरी रनिंग किमी** | **मनपा दर** | **जिल्हाधिकारी कार्यालय** | **औरंगाबाद वॉटर युटिलिटी** | **सातारा देवळाई** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5000 लि. | 80 किमी | रु.3146/- | रु.(740+720) = 1460/- | रु.(350x8) 2800/- | रु.(875+920) = 1795/- |
| 2 | 10000 लि. | 60 किमी | रु.3899/- | रु.(1480+1080) = रु.2560/- | रु.(720x5) रु.3600/- | रु.(1750+1380) = 3130/- |

पाणी पुरवठ्याचे सोबतच्या तक्यात तुलनात्मक दर पाहता सातारा देवळाईचे कंत्राटदाराकडून हे काम करुन घेणे महानगरपालिकेच्या हिताचे होते. त्यामुळे कामाची तातडी पाहता महाराष्ट्र महानगरपालिकेचे अधिनियम कलम 67 (3) (क) मध्ये मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद हे अगोदर पासुन महानगरपालिकेत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणारे ठेकेदार असून, त्यांना हे काम देण्यात आले आहे. ही पर्यायी व्यवस्था निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून, Stop-Gap Arrangement आहे. शहरासाठी काढण्यात आलेली निविदा अंतिम होई पर्यंत हे काम त्यांना मा.आयुक्त यांची मंजुरी घेऊन या कार्यालयाचे आदेश क्र. मनपा/काअ/पापु/2017/40 दि.04.02.2017 अन्वये देण्यात आलेले आहे. निविदा अंतिम झाल्यास कोणत्याही क्षणी या कामाचे आदेश रद्द करण्यात येणार आहेत.

आदेशाप्रमाणे ठेकेदाराने दि. 01.07.2017 ते 31.07.2017 पर्यंत 82 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला आहे त्याचे देयक रक्कम रुपये 36,16,414/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून रक्कम रुपये 34,71,757/- इतके अदा करण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता व दि. 01.08.2017 ते 31.08.2017 पर्यंत 71 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला आहे त्याचे देयक र.रुपये 33,23,425/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून र.रु.31,90,488/- इतके अदा करण्याकरीता मंजुरीस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य : चर्चा करायची आहे अधिकारी नाही.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी दि. 01.07.2017 ते 31.07.2017 पर्यंत 82 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला असल्यामुळे, त्याचे देयक रक्कम रुपये 36,16,414/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून रक्कम रुपये 34,71,757/- चे देयकास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते, तसेच दि.01.08.2017 ते 31.08.2017 पर्यंत 71 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला असल्यामुळे, त्याचे देयक र.रुपये 33,23,425/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून र.रु.31,90,488/- इतके देयक अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 112 : (उपआयुक्त (महसूल)**

उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन 2017-18 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणि संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी ई-टेंडरद्वारा निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यांत येत आहे.

प्रथमवेळी तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. श्री.मुसा अब्दुल करीम यांचे दर रूपये 99.00 हे सर्वात कमी होते. त्यामुळे त्यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यांनी दोन महिने पुरवठा केल्यानंतर बीफचा पुरवठा बंद केला. त्यांनी पुरवठा बंद केल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांचे नांव काळ्या यादीत टाकण्यात आले. प्राण्यांना बीफ खाद्य देणे गरजेचे असल्यामुळे, दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक श्री.अब्दुल हमीद कुरेशी यांचे दर रूपये 121.00 नुसार बीफ खरेदी करण्यात येत आहे.

नवीन दर निश्चितीसाठी पुन्हा फेर निविदा मागवण्यात आल्या. यावेळी चार निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर रूपये 135.00 प्राप्त झाले. निविदाधारक प्राप्त दर कमी करण्यास तयार नसल्याने पुन्हा फेरनिविदा मागवण्यात आली. यावेळी पहिल्यांदा दोन निविदा, दुसऱ्यांदा शुन्य निविदा, तीसऱ्यांदा एकच निविदा प्राप्त झाली. त्यामुळे चौथ्यांदा फेर निविदा काढण्यात आली. चौथ्यावेळी तीन निविदांची विक्री झाली असून तीन भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | दर प्रति किलो रूपये |
|---|---|---|
| 01. | अब्दुल करीम अब्दुल रहीम कुरेशी | रू.140.00 |

| | | |
|---|---|---|
| 02. | फेरोजखान रहेमानखान | रू.155.00 |
| 03. | अब्दुल अजीम कुरैशी | रू.164.00 |

वरील तीन निविदा धारकांपैकी श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम कुरेशी यांचे दर रू.140.00 प्रति किलो सर्वात कमी आहेत. निविदाधारकासोबत दरासंबंधी मुख्य लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांचेसह वाटाघाटी केल्या असता, प्राप्त निविदा दर रूपये 140/- प्रति किलो ऐवजी रूपये 134/- प्रति किलो दराने बीफचा पुरवठा करणेसंबंधी निविदाधारकाने होकार दिलेला आहे. वाटाघाटी अंती निश्चित झालेले रू.134/- प्रति किलो या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

प्राणि संग्रहालयात वाघ, पांढरे वाघ, बिबटे, कोल्हे, लांडगे, तरस, मगर व उदबिल्ले असे एकूण 22 मांसाहारी प्राणी असून केंद्रीय प्राणि संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्राण्यांकरिता बीफ खाद्य पुरवठ्यासाठी प्राप्त दराने अंदाजे वार्षीक खर्च रू.26,58,292.00 अपेक्षीत आहे.

तुलनात्मक दरानुसार प्राणी संग्रहालयातील मांसाहारी प्राण्यांसाठी बीफ खरेदी करीता श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम कुरेशी यांचे दर रू.134.00 प्रति किलो दराचे मंजुरीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.112 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2017-2018 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम कुरेशी यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती निश्चित झालेले रू.134/- प्रति किलो या दराने त्यांचेकडून बीफ खरेदी करणेच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. 113 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जायकवाडी (नवीन व जुने) पंपगृह येथील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होऊन पाणी पुरवठ्यामध्ये अडचण निर्माण होत होती. त्याकरीता मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद यांनी दिनांक 21/08/2017 रोजी स्थळ पाहणी केली आहे. विद्युत पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी उपाय म्हणुन महावितरण यांनी Ring Main Unit बसविण्यासाठी रूपये 29,57,302/- चे अंदाजपत्रक तयार करून महानगरपालिकेस सादर केले. सदर अंदाजपत्रकास दिनांक 23/09/2017 रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरील काम महावितरण कंपनी, औरंगाबाद मार्फत होणार असल्यामुळे, रक्कम रूपये 29,57,302/- चा धनादेश M.S.E.D.C.L. औरंगाबाद यांचे नावे देणे आवश्यक आहे.

या कामासाठी होणारा खर्च हा सन 2017-18 च्या अर्थसंकल्प पाणी पुरवठा वीज देयके लेखाशिर्षाखाली करण्यात येईल.

तरी जायकवाडी (नवीन व जुने) पंपगृह येथे Ring Main Unit बसविण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 29,57,302/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.113 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जायकवाडी (नवीन व जुने) पंपगृह येथील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होऊन पाणी पुरवठ्यामध्ये अडचण निर्माण होत असल्यामुळे, व विद्युत पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी उपाय म्हणुन महावितरण यांनी Ring Main Unit बसविण्यासाठी केलेल्या सूचनेनुसार या कामासाठी येणाऱ्या रूपये 29,57,302/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 114 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन 2017-18 या आर्थिक वर्षी नागरी हिवताप योजना मलेरिया विभागाअंतर्गत लागणारे अळीनाशक, किटकनाशक औषधी खरेदी करीता ई-निविदा दि.09/06/2017 ला मागविण्यात आली होती.

मे.क्रिऐटीव्ह ॲग्रो केमिकल ॲण्ड सिडस्, टाईम्स कॉलनी यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेल्या दरानुसार सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी सदरील एजन्सीकडून अळीनाशक व किटकनाशक औषधी खरेदी केल्यास त्याचा खर्च खालीलप्रमाणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | अळीनाशक किटकनाशक औषधांचे नाव | एकूण वार्षिक मागणी | वाटाघाटी नंतरचे मंजुर दर प्रति लिटर | अपेक्षित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|
| 01. | अबेट (टेमिफॉस) 50% | 750 लिटर | रू.1650/- | रू.12,37,500/- |
| 02. | पॅरेथ्रम 2% | 300 लिटर | रू.2250/- | रू.6,75,000/- |
| 03. | बीटी आय लिक्वीड | 200 लिटर | रू.1800/- | रू.3,60,000/- |
| 04. | सायफिनोथ्रीन 5% | 300 लिटर | रू.1900/- | रू.5,70,000/- |
| 05. | एमएलओ (M.L.O.) | 1000 लिटर | रू.110 | रू.1,10,000/- |
| | | | एकूण :- | रू.29,52,500/- |

सदरील खर्चास मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी क-3, मलेरिया विभाग 6322532003, E-30, औषधी खरेदी लेखाशिर्ष तरतूद रक्कम रूपये 50 लक्ष एवढी आहे व अपेक्षित खर्च रक्कम रूपये 29,52,500/- आहे. करिता सदरील खर्चास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

श्रीमती किर्ती शिंदे : जेंव्हा वार्डात औषध फवारणी होते तेंव्हा सदस्यांच्या कल्पना दिली जात नाही.अनेक ठिकाणी फवारणीच होत नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी : कामगार विभागाकडून कर्मचारी आलेले आहे आता प्रत्येक वार्डसाठी एक कर्मचारी देऊन फवारणी चे कामे केले जातील.

श्री.रेणुकादास वैद्य : 115 वार्डात औषध फवारणी धुर फवारणीचे प्लॅनींग करावे ज्या ज्या वेळी फवारणी करणार त्यावेळी त्या वार्डाचे सदस्य यांना कळविण्यात यावे. कोणतेवेळी कुठे फवारणी होईल त्याचा चार्ट करावा त्याची वेळ निश्चित करावी.तसे वार्डाच्या सदस्यांना लेखी दयावे.

मा.सभापती : योग्य ते नियोजन करून कार्यवाही करावी विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2017-18 या आर्थिक वर्षी नागरी हिवताप योजना मलेरिया विभागाअंतर्गत लागणारे अळीनाशक, किटकनाशक औषधी खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रूपये 29,52,500/- पर्यंत मे.क्रिऐटीव्ह ॲग्रो केमिकल ॲण्ड सिडस्, टाईम्स कॉलनी यांचेकडून अळीनाशक, किटकनाशक औषधी खरेदी करणेच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 115 :**

विषय : वार्ड क्र.67 सिल्लेखाना अंतर्गत सब्जीमंडी, छोटा तकीया, बडा तकीया, येथे कॉंक्रीटींग करणे, या कामाचे ठेकेदार श्री.शे.शहानवाज शे. नवाब गर्व्ह.कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.29,82,403/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-2016-AMCA-185398-3 सन 2016-17

महोदय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.02 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | रक्कम रू.29,97,351/- मा.स्थायी समिती विषय क्र.84, दिनांक 24/11/2016 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रू.29,82,403/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-महाटेंडर विभाग जा.क्र./मनपा/वार्ड-अभि-2/181/ 2016 दि.17/12/2016 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.31/12/2016 ते 09/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 05/07/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीसऱ्या वेळेस एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | शे.शहानवाज शे.नवाब गर्व्हे.कॉन्ट्रक्टर, औरंगाबाद | 29,82,403.00 | 0.50% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | प्रो-पुअर बजेट अंतर्गत नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | प्रो-पुअर बजेट अंतर्गत नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित काम श्री.शे.शहानवाज शे.नवाब गर्व्हे. कॉन्ट्रॅक्टर, औरंगाबाद यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी या दराने निविदा दाखल केली आहे.<br>तरी सदरील काम ठेकेदार शे. शहानवाज शे. नवाब गर्व्हे. कॉन्ट्रॅक्टर, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.29,82,403/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्रमांक 115,116 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.67 सिल्लेखाना अंतर्गत सब्जीमंडी, छोटा तकीया, बडा तकीया, येथे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी तिसऱ्या वेळेस एकच निविदा प्राप्त असल्याने, निविदाधारक ठेकेदार श्री.शे.शहानवाज शे.नवाब गर्व्हे.कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.29,82,403/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 116 :**

विषय :फिरदोस गार्डन, पडेगाव येथे 100 व 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के जलवाहीनी टाकणे.

संदर्भ : Tender ID : 2017-AMCA-206177-4

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप | जलवाहीनी टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | --- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 28,05,124.00 |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 30/06/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 04/07/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे. नुर कन्स्ट्रक्शन | 42,90,437.46 | 52.95 % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | सन 2016-17, AOSG अंतर्गत |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही |

तरी विषयाकिंत काम चौथ्या वेळेस मागविलेल्या निविदेतील सक्षम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 52.95% जास्त दराची निविदा प्राप्त होती. वाटाघाटीअंती मे.नुर कन्स्ट्रक्शन यांनी 32.81% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. तरी सक्षम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.81% जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 37,25,485/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फिरदोस गार्डन, पडेगाव येथे 100 व 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के जलवाहीनी टाकणे या कामासाठी चौथ्या वेळेस मागविलेल्या निविदापैकी प्राप्त निविदा एकच असल्याने निविदाधारक यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.81% जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 37,25,485/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 117 :**

विषय : वार्ड क्र.33 मिसरवाडी येथील रस्त्यांचे कॉंक्रीट करणे, या कामाचे ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.7495752/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्र.-2017-AMC-235695-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 7496502/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई सेल विभागामार्फत प्रसिध्दी दि.18/05/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | -- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 01/09/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेक्‍दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | 7495752/- | 0.01 % कमी दराने |
| 2 | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद | 7713900/- | 2.90% जास्त दराने |
| 3 | श्री.मनोहर ढोबले | 7788065/- | 3.90% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | दलित वस्ती सुधार योजना |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.838 दि.29/12/2016 |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.7495752/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : तसेच अजूनही काही ऐनवेळचे विषय आहेत त्यात 1) दलित वस्ती वार्ड क्र.33 रस्त्याचे क्रॉक्रीटींग करणे, 2) चार चाकी वाहन (डिझेल कार) खरेदी करणे, 3) कर्मचारी योगेंद्रसिंग राजपूत यांचे अपील, 4) सिंधी समाजाचे एक पत्र 10 टक्के जागा वापरासाठी देणे संबधीत विषय आहे ते सर्व ऐनवेळचे विषय मंजूर करण्यांत येत आहे. ज्या सूचना प्रशासनाला करण्यात आल्या, त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.33 मिसरवाडी येथील रस्त्यांचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.7495752/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 118 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.महापौर, मा.उपमहापौर, व इतर स.पदाधिकारी यांना कार्यालयीन कामी वापरासाठी महानगरपालिकेतर्फे वाहन पुरविण्यात येते. त्यासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.28 दिनांक 03/08/2012 नुसार मंजुर केलेली समकक्ष रक्कम देण्यात येते.

विद्यमान सभापती महोदय हे सध्या स्वतःचे वाहन वापरत आहेत. परंतु मा.सभापती, स्थायी समिती यांनी कळविले आहे की, सद्यस्थितीत पदाधिकाऱ्यांना प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणारी वाहने चांगल्या स्थितीत नसल्याने त्यांना स्वतःची वाहने वापरावी लागतात, त्यामुळे सभापती, स्थायी समिती पदाकरीता नवीन वाहन खरेदी करणे बाबत कळविले असून, महानगरपालिकेकडे चांगल्या स्थितीतील डिझेल कार उपलब्ध नाही, त्यामुळे नवीन डिझेल कार खरेदी करणे योग्य होईल.

नवीन सियाज डेल्टा डिझेल कार खरेदीसाठी मे.ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा.लि. या मारूती सुझुकी इंडिया लि. कंपनीचे अधिकृत विक्रेते यांच्या दरपत्रकातील दरानुसार एकूण रूपये 988219/- खर्च येतो. (सर्व करासहीत) प्राप्त दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या अटी शर्ती प्रमाणे वाहन खरेदी करतांना जी किमंत असेल ती अदा करावी लागेल. तथापी कंपनीकडून आर.सी. दरानुसार दरपत्रक प्राप्त झाल्यास त्या दरानुसार वाहन खरेदी करण्यात येईल.

सदरील कार खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रूपये 988219/- च्या खर्चास मान्यता मिळावी.

| Sr. no. | Description | Amount |
|---|---|---|
| 01. | Ciaz Dalta Diesel Car (White) | 988219/- |

तरी वरीलप्रमाणे 1 सियाज डेल्टा डिझेल कार अधिकृत विक्रेता दराने मे.ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रूपये 9,88,219/- च्या खर्चा बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यमान सभापती महोदय हे सध्या स्वतःचे वाहन वापरत असल्याने तसेच मा.सभापती, स्थायी समिती यांनी कळविल्यानुसार आणि महानगरपालिकेकडे चांगल्या स्थितीतील डिझेल कार उपलब्ध नसल्याने, मा.सभापती-स्थायी समिती यांचे वापरासाठी 1 (एक नग) सियाज डेल्टा डिझेल कार अधिकृत विक्रेता मे.ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेस किंवा आर.सी. रेट उपलब्ध असल्यास त्यादराने चारचाकी वाहन खरेदी करण्यास मंजुरी देण्यांत येते. या वाहन खरेदीसाठी येणाऱ्या एकूण रूपये 9,88,219/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 119 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.योगेंद्रसिंग आनंदसिंग राजपुत,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-4 महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-1/2016/1669, दिनांक 14/10/2016 अन्वये पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : श्री.योगेंद्रसिंग आनंदसिंग राजपुत,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-4 या कर्मचाऱ्यास प्रशासनाने कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई पदावर पदावनत केलेले आहे, प्रशासनाने पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे अपील सादर केलेले आहे, त्यांचे अपील मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.योगेंद्रसिंग आनंदसिंग राजपुत, (शिपाई), वॉर्ड कार्यालय-4 महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2016/1669, दिनांक 14/10/2016 रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. श्री.योगेंद्रसिंग आनंदसिंग राजपुत,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-4,महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 120 : सिंधी कॉलनी येथील अपील**

सचिव, श्री.शिवाजी सिंधी कॉ-हॉ.सो.लि. जालना रोड, औरंगाबाद यांनी त्यांच्या संस्थेच्या न.भु.क्र.14951, 15014 व 14982 या तीन जागा असून सदर जागांवर जागेच्या 10% क्षेत्रफळा चे बांधकाम करून वापरण्याची परवानगी देण्यात यावी, म्हणुन स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सचिव, श्री.शिवाजी सिंधी कॉ-हॉ.सो.लि. जालना रोड, औरंगाबाद यांनी त्यांच्या संस्थेच्या न.भु.क्र.14951, 15014 व 14982 या तीन जागा असून सदर जागांवर जागेच्या 10% क्षेत्रफळा चे बांधकाम करून वापरण्याची परवानगी देण्यात यावी, म्हणुन स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येत आहे, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद